तीन उबदार घोंगड्या

लेखिका: आयडा लट्रेल

चित्रे: मायकेल डरमॉट



ती वृद्ध स्त्री एका उंच डोंगरावर राहाते. तिच्या घराच्या खिडक्या, दरवाजे, भिंती आणि फरशांवर भेगाच भेगा आहेत. हिवाळ्यात थंड वारे वाहातात आणि तिच्या घराला कापरे भरते, ते गारठून जाते. मग वृद्ध स्त्रीची मुलगी, रिल्डा तिला भेटायला येते आणि आईला ऊब मिळावी म्हणून एक छान घोंगडी देते. पण वृद्ध स्त्री ती घोंगडी आपल्या निष्ठावान गाढवाला देते. निराश होऊन रिल्डा तिचा भाऊ हॅन्स याला आईला दुसरी घोंगडी देण्याचा आग्रह करते. पण दयाळू वृद्ध स्त्री ही दुसरी घोंगडी आपल्या छोट्या बकरीला देते. मग हॅन्स आणि रिल्डा आपला भाऊ जेकब याला आईला तिसरी घोंगडी देण्याचा आग्रह करतात. पण जेकबने दिलेली तिसरी घोंगडी वृद्ध स्त्री आपल्या लाडक्या कुत्र्याला देते. तरीही, वृद्ध स्त्री हिवाळ्याच्या गोठवून टाकणाऱ्या थंडीत आनंदी आणि प्रसन्न दिसते.



तीन उबदार घोंगड्या


मराठी अनुवाद: सुशील मेन्सन



एका उंच डोंगरावरील जुन्या, तुटक्या-फुटक्या घरात एक वृद्ध स्त्री राहात होती. तिच्या घराच्या खिडक्यांना आणि दरवाजाला भेगा पडल्या होत्या. घराच्या भिंतिंमध्ये आणि फरशांवरही भेगा होत्या. हिवाळ्याचे आगमन झाल्यावर, दरीतील थंड वारा घोंघावत डोंगरावर येऊ लागला आणि भेगांमधून वृद्ध स्त्रीच्या घरात शिरू लागला. वृद्ध स्त्री घरात केलेल्या आगीजवळ बसून कशीबशी शरीराला ऊब देऊ लागली. तिच्याजवळ असलेली एकमेव घोंगडी तिने स्वत:ला लपेटून घेतली. ती घोंगडी खूप जुनी आणि फाटलेली होती.

आगीकडे टक लावून बघताना तिला तिचा निष्ठावंत गाढव, *गॅरिबाल्डी,* याची आठवण झाली. बाहेर तबेल्यात बर्फाळ वाऱ्याच्या झोतांमुळे त्याचे कान अगदी गारठून गेले असतील, हा विचार मनात येताच, वृद्ध स्त्री थरथरू लागली. मग तिला दूध देणारी आपली छोटीशी बकरी, *विल्लन्ना,* हीची आठवण झाली. तिच्या नाकाला हा गारगार वारा झोंबत असेल, असा विचार मनात येताच, तिचे स्वत:चेच नाक बधीर झाले. मग वृद्ध स्त्रीने आपला थकलेला वृद्ध कुत्रा, हर्मन, याला बघितले. तो घराची राखण करीत असे. त्याचे पाय या थंड वाऱ्यामुळे गारठून कडक झाले असतील, असा विचार मनात येताच, तिचे स्वत:चे पाय बर्फासारखे कडक, काळेनिळे झाले आणि तिचे दात करकरू लागले.

त्याचवेळी तिच्या मुलीने, रिल्डाने दारावर टकटक केली.
“आई,” ती म्हणाली, “तू हे घर सोड. हे राहायच्या लायकीचं राहिलं नाही आता. आम्ही याच्या भेगा बुझवल्या तरी दुप्पट नव्या भेगा पडतात याला. माझं घर छान आहे. गावात चल आणि माझ्यासोबत राहा. तिथे खिडकीत बसून बाहेरची रहदारी बघण्यात तुझा वेळ छान जाईल. माझ्याकडे फार काही नाही, पण जे आहे ते आपण वाटून घेऊ.”
“आणि माझं गाढव, माझी बकरी, माझा कुत्रा! त्यांचं काय?” वृद्ध स्त्रीने विचारले.
“तुला त्यांची गरज भासणार नाही,” रिल्डा म्हणाली.
“पण त्यांना माझी गरज आहे,” वृद्ध स्त्री म्हणाली, आणि तिने ते घर सोडण्यास नकार दिला.



त्या रात्री सूं-सूं आवाज करत थंडगार वारा भेगांमधून घरात शिरला. वृद्ध स्त्रीने नवी ऊबदार घोंगडी अंगावर लपेटून घेतली. अचानक, तिच्या मनात गॅरिबाल्डीचा विचार आला. गाढवाकडे आपले कान ऊबदार ठेवण्यासाठी घोंगडी किंवा आग नव्हती. मग वृद्ध स्त्री तिची छान, मऊशार, निळी घोंगडी घेऊन तबेल्यात गेली. गॅरिबाल्डीला कडाक्याच्या थंडीमुळे झोप येत नव्हती. तो सतत हलत-डुलत होता, आपले पाय जमिनीवर आपटत होता.
“माझा निष्ठावान मित्र,” वृद्ध स्त्री म्हणाली, “आग करायला तू लाकडं वाहून आणतोस. तुला थंडी वाजता कामा नये.” तिने ती छान, मऊशार घोंगडी गाढवाभोवती लपेटली. गाढवाचे कान झाकले जातील याची काळजी तिने घेतली.
गॅरिबाल्डीचे अंग शांत झाले. आपले डोळे बंद करून तो घोरू लागला.





पुढल्या दिवशी वृद्ध स्त्रीने घरात आग करण्यासाठी लाकडे गोळा केली. गॅरिबाल्डीच्या पाठीवर लाकडे लादून ती घरी परतली तेव्हा पुन्हा रिल्डा आली. तिने आईसाठी छान, निळी, मऊशार घोंगडी आणली होती.
“आई,” ती म्हणाली, “तुला या जुन्या घरीच राहायचं असेल, तर ऊब मिळण्यासाठी ही घोंगडी तरी वापर.”
“धन्यवाद, पोरी,” वृद्ध स्त्री म्हणाली. “तू माझी खूप सेवा करतेस. दयाळू आहेस तू.”



रिल्डा पुन्हा घरी आली, तेव्हा तिची आई आगीवर ठेवलेल्या भांड्यात काही ढवळत होती. तिच्या खांद्यावर जुनीच फाटकी घोंगडी होती.
“आई,” रिल्डा म्हणाली, “मी दिलेली नवी घोंगडी कुठाय?”
“आपल्या गॅरिबाल्डीला त्याची जास्त गरज होती,” आई उत्तरली.
“गॅरिबाल्डीच्या अंगावर ही जुनी फाटकी घोंगडी टाकायचीस ना!” रिल्डा म्हणाली. “मी जाऊन परत आणते ती घोंगडी.”
“काय!” वृद्ध स्त्री किंचाळली, “मग माझ्या अंगाला गाढवाचा वास येईल, त्याचं काय? गाढवाच्या अंगावरची घोंगडी मला नको.”
“बरोबर बोलतेस तू,” रिल्डा विचार करत म्हणाली.


मग रिल्डा डोंगर उतरून, गावामधून, शेतामधून चालत आपला भाऊ, हॅन्स, याच्या घरी गेली. त्याचे घर लहान होते, पण त्यांच्या आईच्या घरासारखे मोडकळीस आलेले नव्हते.
“हॅन्स,” रिल्डा म्हणाली. “आई डोंगरावरच्या कडाक्याच्या थंडीत गारठून चाललीय. तिला द्यायला तुझ्याकडे छानशी ऊबदार घोंगडी आहे का?”



“आहे ना!” हॅन्स म्हणाला. मग तो एक छानशी, मऊशार, पांढरीशुभ्र घोंगडी घेऊन शेतामधून, गावामधून चालत डोंगरावर गेला. त्याची आई बकरी, *विल्लन्ना*, हिचे दूध काढत होती. छोट्या बकरीच्या गोड, पौष्टीक दुधाने बादली भरली होती.

“आई, हे घे,” हॅन्स म्हणाला, “ही छानशी घोंगडी तुला ऊब मिळण्यासाठी.”

“तू खूप चांगला मुलगा आहेस,” त्याची आई म्हणाली, “आणि विचारीसुद्धा.”



त्या दिवशी सूर्यास्त झाल्यावर, थंड वारे वाहू लागल्यावर, वृद्ध स्त्री मऊशार, पांढरीशुभ्र घोंगडी अंगावर लपेटून झोपली. पण तिला डोळ्यांसमोर सतत विल्लन्ना दिसू लागली. ती थंडीत कुडकुडत असेल, थंड वारे तिच्या नाकाला झोंबत असतील, असे विचार तिच्या मनात आले. मग वृद्ध स्त्री अंगावरील घोंगडी घेऊन विल्लन्नाकडे गेली. गारठल्यामुळे विल्लन्ना झोपू शकत नव्हती. आपल्या खोपटात ती इकडून तिकडे पळत होती.





“माझी लाडकी बकरी,” वृद्ध स्त्री म्हणाली, “तुझ्यामुळे मला दूध आणि चीज मिळतं खायला. तुलाच ऊब मिळायला हवी.” तिने आपल्या अंगावरची नवी मऊशार, पांढरीशुभ्र घोंगडी विल्लन्नाच्या अंगावर पसरली आणि तिचे नाक झाकले जाईल, हे बघितले. ऊब मिळाल्यामुळे विल्लन्ना खोपटाच्या एका कोपऱ्यात जाऊन शांतपणे झोपली. गारठलेल्या पायांनी वृद्ध स्त्री आपल्या बिछान्यात जाऊन पडली. आपली जुनी फाटकी घोंगडी अंगावर घेऊन ती झोपायचा प्रयत्न करू लागली.



पुढल्या दिवशी जास्त थंडी पडली. आपली आई नव्या मऊशार, पांढऱ्याशुभ्र घोंगडीत आरामात झोपली आहे का, हे बघायला हॅन्स आला. पण त्याची आई पुन्हा जुनी फाटलेली घोंगडी अंगावर घेऊन आगीत हवा फुंकत बसली होती.

"अगं काल दिलेली नवी मऊशार, पांढरी घोंगडी कुठाय?" हॅन्सने विचारले.

"आपल्या विल्लन्नाला त्या घोंगडीची जास्त गरज होती. दूध देते ना ती मला!" आई म्हणाली.

"आई," हॅन्स म्हणाला, "मी जाऊन ती घोंगडी परत आणते. विल्लन्नाला आपण तुझी जुनी फाटकी घोंगडी देऊ."

"काय!" वृद्ध स्त्री किंचाळली. "त्या घोंगडीवर आता बकरीच्या अंगाला चिकटलेल्या बिया असतील, त्या मला टोचतील. ती घोंगडी आता मी अंगावर घेऊ शकत नाही."

"बरोबर आहे तुझं आई," हॅन्स विचार करत म्हणाला.



मग हॅन्स डोंगरावरून खाली उतरला आणि गावामधून, पीठाच्या चक्कीजवळून चालत त्याचा भाऊ, जेकब, याच्या घरी गेला.


“जेकब,” तो म्हणाला, “आपल्या गरीब आईकडे थंडीसाठी एकच फाटकीतुटकी जुनी घोंगडी आहे. तिने रिल्डाने दिलेली घोंगडी तिच्या गाढवाला दिली आणि मी दिलेली बकरीला. आता आमच्याकडे आणखी घोंगडी नाही तिला द्यायला. तुझ्याकडे एखादी चांगली घोंगडी आहे का आईसाठी?”

“हो तर!” जेकब म्हणाला. तो श्रीमंत नसला तरी त्याच्या वृद्ध आईएवढा गरीब नव्हता.

“छान,” हॅन्स म्हणाला. “ती घोंगडी वापरते की नाही, हेसुद्धा जाऊन बघ एकदा. तू आमच्यात थोरला आहेस. ती तुझं नक्की ऐकेल.”



जेकबने एक छानशी, अगदी नवीकोरी आणि ऊबदार घोंगडी घेतली आणि पीठाच्या चक्कीजवळून, गावामधून चालत तो डोंगरावर आईच्या घरी गेला.



"मी तुझ्यासाठी ही छान, ऊबदार घोंगडी आणलीय," जेकब म्हणाला. "ही तुझ्या बिछान्यावर अंथर आणि रात्री आरामात झोप."

"तू खूप प्रेमळ आहेस आणि माझी काळजीसुद्धा घेतोस," त्याची आई म्हणाली.

"आणि आई," जेकब म्हणाला, "गॅरिबाल्डीकडे घोंगडी आहे, विल्लन्नाकडे घोंगडी आहे आणि हर्मनची जाडजूड त्वचा म्हणजे त्याचा ऊबदार कोटच आहे, त्यामुळे त्याला घोंगडीची गरज नाही."

"खूप शहाणा आहेस तू," आई म्हणाली. "तू नेहमी डोक्याने विचार करतोस."


मग तो रिल्डा आणि हॅन्स यांना ही खबर देण्यासाठी डोंगरावरून भरभर खाली उतरला.




रात्र झाल्यावर गारगार वारा वृद्ध स्त्रीच्या घराच्या भेगांमधून आत आला आणि सगळ्या वस्तू गारठून गेल्या. गॅरिबाल्डी आपल्या तबेल्यात नव्या ऊबदार घोंगडीत शांत पहुडला होता. विल्लन्ना आपल्या नव्या पांढऱ्याशुभ्र, ऊबदार घोंगडीत सुखाने झोपली होती. वृद्ध स्त्री जेकबने दिलेली नवी ऊबदार घोंगडी लपेटून आगीसमोर बसून आपल्या पायांना ऊब देत होती.

डोंगराच्या पायथ्याशी लांडगे आवाज करत होते. हर्मन दरवाजातून उठला आणि गारठलेल्या जमिनीवरून, झोंबणाऱ्या वाऱ्यामध्ये धावू लागला. त्याने लांडग्यांचा पाठलाग करून त्यांना दूर पिटाळून लावले. वृद्ध स्त्री दरवाजावर त्याची वाट पाहू लागली.






“बिचारा हर्मन,” वृद्ध स्त्री म्हणाली. “गेली कित्येक वर्ष तू माझं रक्षण केलंस. तुझ्या अंगावर जाडजूड कोट असो किंवा नसो, तुझे पाय गारठूनच जातात. तुला छान घोंगडीची ऊब मिळायला हवी.” मग तिने जेकबने दिलेली नवीकोरी ऊबदार घोंगडी हर्मनच्या अंगावर टाकली. तिने त्याच्या थरथरत्या पायाची बोटे घोंगडीने झाकली जातील, ही काळजी घेतली. हर्मनने कृतज्ञतेने उसासा टाकत तिचे हात चाटले.



मग वृद्ध स्त्रीने आग केली, थोडे दूध गरम केले आणि निजायची तयारी केली. तिने स्वतःला जुन्या फाटक्या घोंगडीत लपेटून घेतले. थोड्याच वेळात, तिला अगदी शांत, ऊबदार झोप लागली.



दुसऱ्या दिवशी रिल्डा, हॅन्स आणि जेकब आईच्या घरी आले, तिने नवीकोरी ऊबदार घोंगडी वापरली की नाही, हे बघायला.

“हे काय?” जेकब ओरडला. “मी दिलेली घोंगडी तू हर्मनला दिलीस! ठीकाय, हर्मनच्या अंगाला गाढवाच्या अंगासारखा वास येत नाही आणि त्याच्या अंगाला बियासुद्धा चिकटलेल्या नाहीत. हर्मनला दिलेली घोंगडी तू अंगावर घेत जा आणि त्याला तुझी जुनी फाटकी घोंगडी दे.

“आणि त्याच्या अंगावरच्या पिसवा मला चावतील, त्याचं काय?” वृद्ध स्त्री म्हणाली. “मी हर्मनची घोंगडी अजिबात वापरणार नाही.”

“अरे हो, पिसवांचा विचारच नाही केला आम्ही,” रिल्डा म्हणाली.

“पण आता आपल्याकडे चांगली घोंगडीसुद्धा नाही उरली!” हॅन्स म्हणाला.

“काही हरकत नाही,” वृद्ध स्त्री म्हणाली, “तुम्ही दिलेल्या घोंगड्यांचा मी चांगलाच वापर केलाय. आता विल्लन्ना सुखाने झोपत असल्यामुळे दुप्पट दूध देते, गॅरिबाल्डीला चांगली विश्रांती मिळाल्यामुळे तो दुप्पट लाकडं वाहून आणतो. गरम दूध माझ्या शरीराला आतून ऊब देते आणि लाकडांची आग केली की शरीर बाहेरून ऊबदार राहाते. त्यामुळे जुन्या फाटक्या घोंगडीने माझं काम भागतं.”



“पण मग हर्मन?” जेकब म्हणाला. “हर्मनला दिलेल्या घोंगडीने तू तुझ्या पायांना ऊब देऊ शकतेस.”
“हो, खरंय,” पण एक निष्ठावान कुत्रा माझी राखण करतो, यापेक्षा ऊबदार गोष्ट आणखी कोणती असू शकते?”



हे ऐकून वृद्ध स्त्रीची मुले आनंदाने आपापल्या घरी निघून गेली. वृद्ध स्त्री आपल्या जुन्या भेगा पडलेल्या घरात तीन ऊबदार घोंगड्या आणि एक फाटकी घोंगडी यांची ऊब घेत राहू लागली.



समाप्त

